**Maharashtra State Council of Educational Research & Training**
(Academic Authority)
708, Kumthekar Road,
Sadashiv Peth, Pine 411030,
Phone -020-24476938, 24475571
Email - equitydept@maa.ac.in

महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे
७०८ कुमठेकर,रोड,सदाशिव पेठ ,
पुणे-४११०३०
दूरध्वनी- ०२०-२४४७६९३८, २४४७५५७१
ईमेल – equitydept@maa.ac.in

www.maa.ac.in

जा.क्र./मराशैसंप्रप/समता/Child Safety/२०१९-२०/ 4170 दि. १८/१०/२०१९

प्रति,

१. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद, सर्व
२. आयुक्त, महानगरपालिका, सर्व

विषय :– मुलांचे हक्क व सुरक्षितता याबाबत जाणीव जागृती उपक्रम सप्ताह दि. १४ ते २० नोव्हेंबर २०१९.

उपरोक्त विषयांन्वये शिक्षण हक्क कायदा २००९ व संयुक्त राष्ट्र संघाच्या बालहक्क संहितेनुसार, बालकांचे हक्क व सुरक्षा याबाबत जाणीव जागृती होण्याकरिता दि. १४ ते २० नोव्हेंबर २०१९ या कालावधीत सोबत जोडलेल्या मार्गदर्शक सूचनानुसार शाळा स्तरावर उपक्रम राबविण्यात यावेत सदर उपक्रमाकरीता शासनस्तरावरून कोणताही निधी दिला जाणार नाही.

उपक्रम राबविल्यानंतर त्याबाबतचा वस्तुनिष्ठ व सविस्तर अहवाल या कार्यालयास सादर करावा.

विशाल सोळंकी (भा.प्र.से.)
आयुक्त (शिक्षण), तथा
संचालक,
महाराष्ट्र राज्य शैक्षणिक संशोधन व
प्रशिक्षण परिषद (विद्या प्राधिकरण), पुणे

प्रत माहितीस्तव –

१. मा. राज्य प्रकल्प संचालक, महाराष्ट्र प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई.
२. मा. आयुक्त (शिक्षण), शिक्षण आयुक्तालय, महाराष्ट्र राज्य पुणे.

प्रत माहिती व योग्य कार्यवाहीस्तव –

१. शिक्षण संचालक (प्राथमिक /माध्यमिक), शिक्षण संचालनालय, महाराष्ट्र राज्य, पुणे.
२. विभागीय शिक्षण उपसंचालक, सर्व विभाग.
३. प्राचार्य, जिल्हा शैक्षणिक सातत्यपूर्ण व्यवसायिक विकास संस्था, सर्व.
४. शिक्षणाधिकारी (प्राथमिक /माध्यमिक), जिल्हा परिषद, सर्व.
५. प्रशासनाधिकारी/शिक्षणाधिकारी, महानगरपालिका, सर्व.

# मुलांचे हक्क आणि सुरक्षा याबाबतचे उपक्रम

शिक्षण हक्क कायद्यानुसार ६ ते १४ वर्ष वयोगटाच्या सर्व मुलांना मोफत, सक्तीचे आणि दर्जेदार शिक्षण मिळण्याचा हक्क प्राप्त झाला आहे. शिक्षण हक्क कायदा येऊन आजही काही कुटुंबातील मुले शाळेत येत नाहीत. त्यामुळे मुलांना शिक्षण घेण्याच्या मूलभूत हक्कापासून वंचित राहावे लागत आहे. सर्व मुलांना शाळेत येती, शिकती व टिकती करण्यासाठी शिक्षण व्यवस्थेतील सर्व यंत्रणा यासाठी प्रयत्न करत आहेत.

बालकांच्या मूलभूत हक्कांचे संरक्षण व्हावे याकरीता सयुक्त राष्ट्रसंघाने सन १९८९ साली बाल हक्कासंदर्भातील बाल हक्क संहिता स्वीकारली असून त्याद्वारे सर्व बालकांना मूलभूत मानवी हक्क मिळण्याचा अधिकार आहे. जसे जीविताचा अधिकार, शारीरिक आणि बौद्धिक सुप्त गुणांचा विकास करण्याचा अधिकार, त्यांच्या विकासावर घातक परिणाम होईल अशा प्रभावापासून संरक्षणाचा अधिकार, तसेच कौटुंबिक सांस्कृतिक आणि सामाजिक जीवनात सहभागी होण्याचा अधिकार इत्यादी.

हा करार उपरोक्त हक्कांचे किमान मानकांच्या आधारे संरक्षण करतो ज्याद्वारे शासनास त्या देशातील मुलांना आरोग्य सेवा, शिक्षण, कायदेशीर आणि सामाजिक सेवा पुरविणे बंधनकारक आहे. हा करार जगभरातील सरकारी अधिकारी, वकील, आरोग्यदूत, सामाजिक कार्यकर्ते, शिक्षक, अशासकीय संस्था आणि प्रादेशिक गट यांच्यातील दहा वर्षाच्या विचारविनिमय आणि वाटाघाटीची फलनिष्पत्ती आहे. सध्या १९३ राष्ट्रांनी या करारावर स्वाक्षरी केलेली आहे व संमती दिलेली आहे. भारत सरकारने ११ डिसेंबर १९९२ या दिवशी या करारावर स्वाक्षरी करून बालकांचे संरक्षण आणि हक्कांची हमी देण्यासाठी स्वतःची बांधिलकी मान्य केली असून आंतरराष्ट्रीय समुदायासमोर यासंबंधीची जबाबदारी स्वीकारली आहे.

बाल हक्क संहितेमध्ये एकूण ५४ कलमे आहेत व त्यांची तीन आधार तत्वे आहेत.

- **भेदभावाला नकार :-**

  प्रत्येक मुलाला वंश, वर्ण, लिंग, धर्म, भाषा, पालकांची राजकीय मते, आई वडील व पालकांची मते श्रद्धा यामुळे भेदभाव न होता त्याचे हक्क मिळाले पाहिजेत.

- **मुलांचे हित प्रथम :-**

  खाजगी आणि सरकारी संस्था, न्यायालये, शासकीय अधिकारी मुलांबाबत निर्णय घेताना मुलांचे हीत सर्वप्रथम पाहतील.

- **मुलांचा सहभाग :-**

  बालकांच्या व्यक्तिमत्वाच्या विकासासाठी त्यांना जीवनाच्या सर्वच क्षेत्रात सहभागाचा हक्क मिळण्याची गरज आहे.

बालके संहितेमध्ये एकूण ५४ कलमे आहेत. एक ते बेचाळीस कलमांमधील हक्कांची विभागणी चार प्रकारात करण्यात आलेली आहे.

१) जगण्याचा हक्क :-

जगण्याच्या अधिकारात प्रत्येक मुलाला खालील अधिकार आहेत.

- जीविताचा आणि विकासाचा.
- समाधानकारक आणि आवश्यक राहणीमान मिळविण्याचा.
- प्राप्त करू शकणाऱ्या उत्कृष्ट आरोग्याचा दर्जा आणि परिणामकारक आरोग्य सेवा मिळण्याबाबत.
- जर तो किंवा ती अपंग असेल, तर अशा बालकाला विशेष सेवा पुरविण्यात याव्यात ज्याद्वारे त्यांचा आत्मसन्मान प्रतिष्ठा जोपासली जाईल. जे स्वावलंबी रहातील आणि त्याचा समाजात कार्यक्षम वावर राहील.
- सामाजिक सुरक्षितता आणि बाल सेवा सुविधा.

२) विकासाचा हक्क :-

विकासाच्या अधिकारात प्रत्येक मुलाला खालील अधिकार आहेत.

- मोफत प्राथमिक शिक्षण शिक्षण.
- माध्यमिक शिक्षण आणि व्यवसाय प्रशिक्षणाची उपलब्धता.
- असे शिक्षण जे त्याच्या किंवा तिच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास, उपजत गुण/प्रतिभा आणि मानसिक, शारीरिक कार्यक्षमता पुर्ण करेल.
- असे शिक्षण जे मुक्त समाज जीवनात त्याला किंवा तिला एक कार्यक्षम नागरिक बनवू शकेल.
- असे शिक्षण जे वाढवेल त्याच्या किंवा तिच्या कुटुंबाचा मान, सांस्कृतिक ओळख आणि भाषा तिच्या किंवा त्याच्या देशासाठी आणि नैसर्गिक पर्यावरणासाठी.
- शिक्षण अशा भावनेचे जे समजावेल शांतता/सोशिकता आणि समानता.
- फुरसतीच्या वेळी खेळ आणि संधी– सांस्कृतिक आणि कलात्मक कार्यक्रमात भाग घेण्याची.
- संधी त्याच्या किंवा तिच्या संस्कृतीचा आनंद लुटण्याची त्याच्या किंवा तिच्या धर्माची ऐट मिरवण्याची आणि त्याची किंवा तिची भाषा वापरण्याची.

३) संरक्षणाचा हक्क :-

संरक्षणाच्या अधिकारात प्रत्येक मुलाला विशिष्ट संरक्षणाचा अधिकार आहे.

- गंभीर परिस्थितीत जस संरक्षणाचा संघर्ष किंवा जेव्हा मूल आपल्या कुटुंबांपासून किंवा घरापासून दूर होतात.
- जेव्हा तो किंवा ती कायद्याच्या विरुद्ध जातात किंवा कायद्याच्या कचाट्यात सापडतात.
- शोषणाच्या स्थितीत जस बालमजुरी, अमली पदार्थांचा गैरवापर, लैंगिक शोषण किंवा निंदा, विक्री, मालाची ने आण आणि अपहरण.
- इतर कोणत्याही प्रकारचा भेदभाव

४) सहभागाचा हक्क :-

सहभागाच्या अधिकारात प्रत्येक मुलाला खालील अधिकार आहेत.

- त्याच्या/तिच्या जीवनावर परिणाम करणाऱ्या सर्व बाबींमध्ये भाग घेण्याचा अधिकार.